पुणे महानगरपालिका कर्मचाऱ्यांचे मुखपत्र

# कल्याणवार्ता

• वर्ष २ रे • अंक : १८ •मार्च, २००९ • पृष्ठे ४

इंटरनेट आवृत्ती – www.punecorporation.org

## निधीची वर्गणी

**कामगार कल्याण निधीची वार्षिक वर्गणी रु. १००/- सर्व अधिकारी/सेवकांच्या माहे एप्रिल पेड इन मे, २००९ चे वेतनातून कपात करण्याची कार्यवाही सर्व पगारपत्रक लेखनिक यांनी करावी.**

## शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या मनपा सेवकांचा परिचय

**श्री. मुबारक करीम तांबोळी :**



पुणे महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडे पाणीवाला या हुद्यावर कार्यरत असलेले श्री. मुबारक करीम तांबोळी हे दिनांक २६/६/१९९६ रोजी महापालिकेच्या सेवेत रुजू झाले. जन्मानंतर ६ महिन्यांमध्ये पायाला पोलिओमुळे अपंगत्व आलेल्या श्री. तांबोळी यांचे दहावीपर्यंत शिक्षण झाले आहे. लहाणपणापासून पोहण्याची आवड असणाऱ्या श्री. तांबोळी यांनी सन १९८६-८७ पासून अपंगांच्या राष्ट्रीय, आंतरराज्य व जिल्हा स्तरावरील क्रीडा स्पर्धांमध्ये अनेक सुवर्ण, रौप्य आणि कांस्यपदके मिळविली आहेत. सन १९९४ मध्ये चीन (बीजिंग) येथे आंतरराष्ट्रीय पॅसिपिक क्रीडा स्पर्धेमध्ये पोहण्याच्या क्रीडा प्रकारात श्री. मुबारक तांबोळी यांनी भारताचे प्रतिनिधीत्व केले होते.

पोहणे या क्रीडा प्रकारांमध्ये मिळविलेल्या विशेष नैपुण्याबद्दल श्री. तांबोळी यांना सन १९९०-९१ या वर्षामध्ये मे. राज्य शासनातर्फे शिवछत्रपती पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. महापालिका सेवेमध्ये असताना सन १९९९ मध्ये थायलंड (बँकॉक) येथे झालेल्या अपंगांच्या आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेमध्ये सहभागी होवून पोहणे या क्रीडा प्रकारात भारताचे प्रतिनिधीत्व केले. तसेच, या स्पर्धेमध्ये व्हॉलिबॉल क्रीडा प्रकारामध्ये सांघिक चौथा क्रमांक मिळविला.

---

**श्री.विनायक काशीनाथ कुलकर्णी :**



पुणे महापालिकेच्या सेवेत दिनांक २०/८/१९९७ रोजी दाखल झालेले श्री. विनायक काशीनाथ कुलकर्णी हे सध्या ज्यु.ग्रे.लेखनिक पदावर कार्यरत आहेत. जन्मानंतर दिड महिन्यांमध्ये दोन्ही पायांना झालेल्या पोलिओमुळे अपंगत्व आलेल्या श्री.कुलकर्णी यांनी प्रतिकुल परिस्थितीशी झगडत बी.कॉम.पर्यंत शिक्षण पूर्ण केले आहे. शैक्षणिक प्रवासामध्ये आई वडिलांनी घेतलेल्या अविरत कष्टामुळे स्वत:च्या पायावर उभे राहिल्याचे श्री. कुलकर्णी सांगताना भावनाविवश होतात. अपंगत्वावर मात करुन काहीतरी वेगळे करण्याच्या इच्छेने झपाटलेल्या कुलकर्णी यांनी क्रीडा क्षेत्रामध्ये भरारी घेण्याचे ध्येय निश्चित करुन सन १९८८ साली अपंगाच्या स्पर्धेत भाग घेतला. त्यामध्ये अपयशी ठरलेल्या कुलकर्णी यांनी निराश न होता अविरत कष्ट करुन नंतर पुणे, मुंबई, दादर, दिल्ली, ठाणे, बेंगलोर, धारवाड अशा अनेक ठिकाणी झालेल्या राष्ट्रीय व आंतरराज्य स्पर्धेत सहभागी होवून अनेक सुवर्ण, रौप्य व कांस्य पदके मिळविली आहेत. सन १९९४ च्या पुणे इंटरनॅशनल मॅरेथॉन स्पर्धेमध्ये व्हिल चेअर गटात श्री. कुलकर्णी यांनी प्रथम क्रमांक मिळविला. तसेच, १९९४ मध्ये चीन (बीजिंग) येथे व सन १९९९ मध्ये बँकॉक येथे झालेल्या स्पर्धांमध्ये पोहणे क्रीडा प्रकारात श्री. कुलकर्णी यांनी भारताचे प्रतिनिधीत्व केले. श्री. कुलकर्णी यांनी क्रीडा क्षेत्रात केलेल्या भरीव कामगिरीप्रित्यर्थ त्यांना सन १९९०-९१ मध्ये शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार देवून मे. राज्य शासनातर्फे सन्मानित करण्यात आले.

---

**श्री.मधुकर बिबवे :**

सन १९८५-८६ मध्ये महापालिकेच्या ऑडिट विभागात ॲप्रेंटिसशिप पूर्ण केलेले श्री. मधुकर बिबवे दिनांक ५/२/१९८८ रोजी सुरक्षा विभागात ज्यु.ग्रे.लेखनिक म्हणून रुजू झाले. श्री. बिबवे यांनी एम.ए. (अर्थशास्त्र), एम.एस.डब्ल्यु., एल.एल.बी., एम.फिल.पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले आहे. दिनांक १२/२/१९९६ पासून नागरवस्ती विकास योजना कार्यालयाकडे समाज सेवक म्हणून त्यांची नेमणूक झाली. मुळत:च सामाजिक कार्याची आवड असणाऱ्या श्री. बिबवे यांना या क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीमुळे सन १९८९ मध्ये सामाजिक कार्याविषयीचा शिवछत्रपती पुरस्कार मे. राज्य शासनातर्फे प्रदान करण्यात आला. सन १९८९ पासून त्यांची कामगार शिक्षण म्हणून निवड झाली. पुणे मनपाच्या सेवेत राहून रचनात्मक, विधायक व सेवाभावी कामांसाठी श्री. बिबवे यांनी विशेष प्रयत्न केले. जाणीव या सामाजिक संघटनेची स्थापना करुन, या संस्थेमार्फत एचआयव्ही एड्सग्रस्तांना प्रत्यक्ष सहाय्य, सल्ला, मार्गदर्शन तसेच तृतीयपंथींना रोजगाराभिमुख प्रशिक्षण, बाल कामगार, रस्त्यावर रहाणाऱ्या मुलांना सहाय्य, इत्यादी सामाजिक कामात श्री. बिबवे यांचा मोलाचा वाटा आहे. श्री. बिबवे हे इंटरनॅशनल इकॉनॉमिक असोसिएशन या संस्थेचे लाईफ मेंबर आहेत. तसेच, इंडियन लेबर इकॉनॉमिक्स सोसायटी व इंडियन सोसायटी ऑफ कोऑपरेटिव्ह स्टडीज या संस्थांचे प्रतिनिधी म्हणून कार्यरत आहेत. पुणे शहर दारिद्र्य निर्मूलनाचे कार्यक्रमात त्यांचा विशेष सहभाग आहे.



## येरवडा क्षेत्रीय कार्यालयांतर्गत आरोग्य तपासणी शिबीर

येरवडा क्षेत्रीय कार्यालयातील चतुर्थश्रेणी सफाई सेवकांचे आरोग्य तपासणीकरिता येरवडा क्षेत्रीय कार्यालय व पुणे शहर व जिल्हा वैद्यकीय व्यावसायिक संघटना यांचे संयुक्त विद्यमाने दि.१८/३/०९ रोजी राजीव गांधी हॉस्पिटल, येरवडा येथे



आरोग्य तपासणी शिबीर आयोजित केले होते.

सदर शिबीरास मा.ज्ञानेश्वर मोळक, उपायुक्त, डॉ.राजेंद्र जगताप, अध्यक्ष व डॉ. विजय वारद, सचिव, पुणे शहर व जिल्हा वैद्यकीय व्यावसायिक संघटना, मा. वसंत पाटील, क्षेत्रीय अधिकारी, येरवडा, मा. डॉ. रेखा गलांडे, क्षेत्रीय वैद्यकीय अधिकारी, येरवडा, विभागीय आरोग्य निरीक्षक, आरोग्य निरक्षक, इत्यादी मान्यवरांचे उपस्थितीत सर्व कर्मचाऱ्यांचे तपासणीचे काम करणेकामी नमूद संस्थेचे सर्व आजारावरील एकूण ३५ तज्ञ डॉक्टर हजर होते.

आरोग्य तपासणीच्या शिबीरास अंदाजे २०० सफाई सेवक तसेच इतर खात्यांचे चतुर्थश्रेणी सेवक हजर होते. त्या सर्व सेवकांची रक्त तपासणी करुन त्यांचे रक्तातील साखरेचे प्रमाण तपासले. त्याचप्रमाणे कान, नाक, घसा, डोळे तसेच हाडांचे आजार असलेल्या सेवकांनी तज्ञांमार्फत तपासणी करुन घेतली. त्या आजारांवरील औषधे कोठे उपलब्ध होतील याबाबत माहिती दिली. तसेच सोनोग्राफीबाबत माहिती दिली. आरोग्य तपासणी झाल्यानंतर प्रमुख पाहुणे म्हणून मा. नंदकिशोर जगताप, सल्लागार (कामगार) यांनी सर्व सफाई सेवकांना आरोग्य विषयक मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे रोगांपासून परावृत्त राहणेसाठी चांगले, निरोगी व निर्व्यसनी राहणेबाबत सर्व मान्यवरांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

## भवानीपेठ कार्यालयाकडील सफाई सेवकांचे आरोग्य शिबीर संपन्न

पुणे मनपा व पुणे जिल्हा वैद्यकीय व्यावसायिक संघटना यांचे संयुक्त विद्यमाने भवानीपेठ क्षेत्रीय कार्यालयाकडील सफाई सेवकांसाठी आयोजित करण्यात आलेले शिबीर दि.२६/२/०९ रोजी जनरल अरुणकुमार वैद्य स्टेडियम येथे संपन्न झाले.



या आरोग्य शिबीरामध्ये भवानीपेठ क्षेत्रीय कार्यालयाकडील ३४६ सफाई सेवकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. शिबीरामध्ये मा. सुरेश जगताप, उपायुक्त, श्री. एम.एस.गायकवाड, क्षेत्रीय अधिकारी, डॉ. अमित शहा, वैद्यकीय अधिकारी, डॉ. राजेंद्र जगताप, अध्यक्ष, पुणे जिल्हा व शहर वैद्यकीय व्यावसायिक संघटना, तसेच या संघटनेचे ३५ वैद्यकीय अधिकारी सहभागी झाले होते.

## आदर्श कार्यालय

प्रत्येक उद्योग, व्यवसायामध्ये प्रशासकीय कामासाठी कार्यालय अनिवार्य आहे. कारण प्रत्येक संस्थेस त्यांचे नियोजित उद्दिष्ट साध्य करण्यासाठी प्रथम धोरण, कार्यध्दती निश्चित करुन त्याप्रमाणे अंमलबजावणी करणे व अंमलबजावणी निश्चित धोरणानुसार वेळेत व प्रभावीपणे होते किंवा नाही याचेवर व्यवस्थापकीय नियंत्रण ठेवणेसाठी कार्यालयाची आवश्यकता असते. कार्यालयात सर्वसाधारणपणे माहिती, संपर्क, नियंत्रण व प्रशासन केंद्र तसेच समाज व ग्राहक मार्गदर्शन केंद्र म्हणून संबोधण्यात येते. कार्यालयाचे प्राथमिक कार्य म्हणून माहितीचे संकलन, नोंद, जतन, विश्लेषण व माहिती पुरविणे या बाबी महत्वाच्या मानल्या जातात. तसेच, प्रमुख कार्यामध्ये कामाचे नियोजन, कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, पत्रव्यवहार, संपत्ती व मालमत्तेची नोंद, नियंत्रण, दळणवळण, देखभाल दुरुस्ती, कार्यपध्दती, कामाची विभागणी, जनसंपर्क, इत्यादींचा समावेश होतो.

आधुनिक काळात कार्यालयाची रचना, स्वरुप व कार्यपध्दतीमध्ये आमूलाग्र बदल झाल्याचे दिसून येते. उद्योग, व्यवसाय संस्थेच्या विस्ताराबरोबरच कामाचा व्याप वाढला आहे. कार्यालयांतर्गत विविध विभाग निर्माण झाले आहेत. कार्यप्रवाहाचा विचार करुन कर्मचाऱ्यांची बैठक व्यवस्था करणे क्रमप्राप्त झाले आहे. एका बाजूला इमारत बांधकाम व देखभाल खर्च कमी ठेवून दुसऱ्या बाजूला आवश्यक साधनसामग्रीची रचना, कामातील नियमितता व व्यवस्थितपणा याचा विचार करुन कार्यालय स्थापन करणे आवश्यक झाले आहे. कार्यालय स्थापन करताना जागा, वातावरण, सुरक्षितता, अंतर्गत व बाह्य रचना, सेवासुविधा, नागरिकांची सोय, हवा व प्रकाश, इ.बाबी विचारात घ्याव्या लागतात. लोकसहभाग वाढल्याने ग्राहकाभिमुख सेवा देणारी संस्था म्हणून उद्योग, व्यवसाय व कार्यालयाकडे पाहिले जात असल्याने ग्राहक, उपभोक्ते व नागरिक यांची सोय पाहून कार्यालय स्थापनेबाबत नियोजन करावे लागते.

स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रमुख कार्य शहरातील नागरिकांना नागरी सेवा सुविधा पुरविणे हे असून, नागरिकांची सोय विचारात घेवून कार्यालय स्थापन करीत असतात. ७४ व्या घटना दुरुस्तीनुसार पुणे महापालिकेने कामकाजाचे विकेंद्रीकरण केले आहे. शहराच्या ४ विभागांमध्ये १४ क्षेत्रीय कार्यालयांची स्थापना केली आहे. महापालिकांचा कारभार जास्तीत जास्त लोकाभिमूख आणि नागरिकांच्या सोयीसाठी व हिताचा होईल, या दृष्टीने कार्यालय स्थापन करण्यात आली आहेत. साधारणपणे उपलब्ध साधनसामग्री आणि मनुष्यबळ यांची केलेली मांडणी किंवा रचना म्हणजे आदर्श कार्यालय होय. यामध्ये बारनिशी, लेखा विभाग, धारिका, यांत्रिक उपकरणे, साधन सामग्री, इत्यादींसाठी व्यवस्था असणे आवश्यक आहे. तसेच, कर्मचारी खरेदी विक्री, जाहिरात, नियोजन व सामान्य प्रशासन विभाग, इत्यादींचाही विचार करणे आवश्यक ठरते. कार्यालय प्रमुखांची बसण्याची ठिकाणे आणि त्यालगत संबंधित खातेप्रमुखांची कार्यालय अशी सर्वसाधारण रचना असावी. याशिवाय चर्चा, परिसंवाद, प्रशिक्षण, इत्यादींसाठी स्वतंत्र जागेची आवश्यकता भासते. तसेच, दूरध्वनी, स्वियसहाय्यक, प्रतिक्षालय, इत्यादी लहानसहान बाबींचाही कार्यालय स्थापन करताना विचार करणे क्रमप्राप्त ठरते. कार्यालयातील उपलब्ध जागेचा पर्याप्त वापर करुन, योग्य मांडणी करुन, सेवकवर्गाची हालचाल सुकर राहून त्यावर परिणामकारक पर्यवेक्षकीय नियंत्रण राहण्याच्या दृष्टीने बैठक व्यवस्था करावी लागते. अंतर्गत संदेशवहन, धारिका पध्दती, इत्यादी बाबी विचारात घेवून कार्यालयातील सर्व साधनांची शास्त्रीय पध्दतीने मांडणी करणे म्हणजे आदर्श अंतर्गत रचना होय.

कार्यालयीन वातावरणात सुधारणा होवून कार्यपध्दतीचे सुलभीकरण होणेसाठी महाराष्ट्र शासन राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान राबवित आहे. यावरुन कार्यालयीन व्यवस्थापनेस किती महत्व प्राप्त झाले आहे, हे दिसून येते. अभियानाद्वारे प्रशासन लोकाभिमुख व गतीमान करणे, नियमाचे/अधिनियमांचे एकत्रीकरण व सुसूत्रीकरण करणे, उत्पन्न वाढ, खर्च कपात करणे, संगणकाचा पर्याप्त वापर, कामाचे सुलभीकरण, कार्यालयीन वातावरणात व कार्यपध्दतीमध्ये सुधारणा करणे हा प्रमुख हेतू असल्याचे दिसून येत आहे. या अनुषंगाने अधिकारांचे विकेंद्रीकरण, एक खिडकी योजना, नागरिक तक्रार निवारण दिन, लोकशाही दिन, कर्मचाऱ्यांच्या आस्थापना विषयक सुधारणा, प्रचलित कार्यपध्दतीमध्ये सुलभीकरण व परिणामी व्यवस्थापकीय स्तरावर आमूलाग्र बदल करणेत येत आहेत. मानवी हाताळणी कमी होवून कागदविरहित प्रशासन निर्माण होणेसाठी विशेष प्रयत्नांची गरज आहे, हे विचारात घेवून बहुतेक सर्व शासकीय कार्यालयांमधून संगणकीय प्रणाली विकसित करुन त्याद्वारे दैनंदिन कामकाज करणे व्यवहार्य व अपरिहार्य होत आहे. त्या दृष्टीने योग्य ती पावले प्रशासन उचलत असल्याचे दिसून येत आहे. कार्यालयातील वातावरण, त्या अनुषंगाने नवनवीन संगणकीय प्रणाली व कार्यपध्दती विकसित करुन नागरिकांना दर्जेदार नागरी सुविधा वेळेवर देणेच्या दृष्टीने आधुनिकतेची कास धरुन कालानुसार कार्यालय मांडणी करुन व्यवस्थापकीय नियंत्रण ठेवणेकामी वरीलप्रमाणे आदर्श कार्यालय नागरिकांच्या सोयीसाठी त्यांच्या नजिकच्या क्षेत्रात स्थापन करणे अनिवार्य आहे. ही बाब विचारात घेवून प्रशासनाची वाट चालू आहे व ही प्रक्रिया अनंत कालावधीसाठी चालू रहाणार आहे.

## परिचय कार्यकर्ता/अधिकारी/सेवकांचा

### कलाकार मनपा सेवकातर्फे सामाजिक प्रबोधन

मे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार आणि घन कचरा व्यवस्थापन नियम २००० नुसार नागरिकांनी निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे ओला आणि सुका वर्गिकरण करुन ओल्या कचऱ्याची उगमाच्या ठिकाणी विल्हेवाट लावावी, असे बंधन घालण्यात आलेले आहे. शहरातील कचरा गोळा करणे, वाहतुक करुन विल्हेवाट लावणे ही जबाबदारी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांवर बंधनकारक आहे. तथापि, संपूर्ण प्रक्रियेत नागरिकांचा सहभाग वाढविल्यास कचऱ्याची विल्हेवाट परिणामकारकरित्या करणे स्थानिक स्वराज्य संस्थांना सहज शक्य होईल. तथापि, यासाठी नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणावर प्रबोधन करण्याची आवश्यकता विचारात घेवून श्रमिक कला पथकाने पथनाट्याद्वारे नागरिकांचे प्रबोधन करण्याचा अनोखा उपक्रम सुरु केला आहे. या पथकातील सदस्य श्री. चंद्रकांत रामचंद्र जाधव, जेसीबी ऑपरेटर, व्हेईकल डेपो यांचे हे मनोगत.

मी श्री. चंद्रकांत जाधव, व्हेईकल डेपो येथे गेली १२ वर्षांपासून जेसीबी ऑपरेटर या पदावर कार्यरत आहेत. जेसीबी मशिन चालविणे अत्यंत जोखमीचे आणि चालकास शारिरीक हानी करणारे आहे. कारण जेसीबी चालविताना फार मोठ्या प्रमाणावर शरीरास हादरे बसून हाडांवर त्याचा विपरित परिणाम होतो. कामामुळे मला शस्त्रक्रियेस सामोरे जावे लागले आहे. तथापि, असे असूनही मी प्रामाणिकपणे, निष्ठेने आणि पूर्वीच्याच कार्यक्षमतेने अद्यापही व्हेईकल डेपो विभागामध्ये कार्यरत आहे व रहाणार आहे.

याच कालावधीत श्रमिक कला पथकातील प्रमुख गायक आणि पुणे मनपा कामगार युनियनचे कार्यकर्ते श्री. महादेव शिवराज जाधव यांचेशी संपर्क आला. या संपर्कामधून शीघ्रकवी म्हणून परिचित असलेले श्री. महादेव जाधव यांनी माझ्यातील कलागुण ओळखून पथकात काम करण्याचे आवाहन केले. श्री. जाधव हे एक उत्कृष्ट वक्ते असून, हार्मोनिअम वाजविण्याची कला त्यांना अवगत आहे. मी पूर्वी नाटकामधूनही कामे केली असून श्रमिक कला पथक करत असलेल्या प्रबोधनपर कार्यक्रमाचे महत्व विचारात घेवून कामगार संघटनेच्या सरचिटणीस मा. मुक्ता मनोहर यांचेशी संपर्क आला.



संघटनेची कामगारांप्रति असलेली तळमळ आणि स्वच्छ पुणे, सुंदर पुणे हा प्रशासनाने सोडलेला संकल्प या विचाराने मी प्रेरित झालो आणि श्रमिक कला पथकाचा सदस्य झाल्याचे श्री. जाधव आवर्जून नमूद करतात. श्री. जाधव यांनी १२ वर्षांच्या कालावधीमध्ये जेसीबी ऑपरेटर, गाडी

**संवादक : शिवाजी दौंडकर**
**कामगार कल्याणाधिकारी**

खाली करणे, कचरा हवारी करुन जागा करणे, पौड कचरा डेपो, रामटेकडी कचरा डेपो, देवाची कचरा डेपो, इत्यादी ठिकाणी काम केले आहे. सद्यस्थितीत पुणे महापालिकेच्या हद्दीत निर्माण होणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या सर्व प्रक्रियेमध्ये व्हेईकल डेपो विभागास मोठ्या प्रमाणात जबाबदारी पार पाडावी लागते. कचरा डेपोवर कचरा टाकण्यास जागा नसल्याने टाकलेला कचरा मशिनच्या सहाय्याने हवारी करुन, नवीन कचरा टाकण्यासाठी जागा निर्माण करण्याची मोठी जबाबदारी श्री. जाधव यांनी त्यांच्या कार्यकालात पार पाडली आहे.

वरील गंभीर विषयाबाबत पुणेकर नागरिकांमध्ये जनजागृती करुन त्यांना ही वस्तुस्थिती पटवून देणे आवश्यक आहे. तसेच, कचऱ्याची विल्हेवाट उगमाच्या ठिकाणी केल्यास पर्यावरण रक्षणाबरोबर प्रशासकीय यंत्रणेवर येणारा ताण कमी होवून कचऱ्याची विल्हेवाट परिणामकारक रितीने लावणे शक्य होईल. या भावनेने श्रमिक कला पथक संपूर्ण पुणे शहराच्या विविध भागांमध्ये जावून नागरिकांचे प्रबोधन करत आहे. तसेच ओला सुका कचरा वेगळा करणे, सार्वजनिक ठिकाणी घाण न करणे, कचरा रस्त्यात व इतस्त: टाकू नये, स्वच्छतेमुळे शहराचे आणि पर्यायाने वैयक्तिक आरोग्य सुदृढ रहाते. ओला व सुका कचरा म्हणजे काय, त्याची विल्हेवाट कशी लावावी, प्लास्टिक कचऱ्याबाबत काय कार्यवाही करावी, इत्यादी बाबींच्या अनुषंगाने श्रमिक कला पथक नागरिकांचे पथनाट्य, संदेश व घोषवाक्यांद्वारे प्रबोधन करत आहे. या उपक्रमास नागरिकही मोठ्या प्रमाणावर सकारात्मक प्रतिसाद देत असल्याचे श्री. जाधव सांगतात. त्यापैकी पुणे शहर स्वच्छ करण्यासाठी कलापथकाची तळमळ आणि धडपड पाहून खूप आनंद झाला. त्यासाठी आवश्यक असणारे सहकार्य मी व माझे कुटुंबिय निश्चितपणे करु अशी बोलकी प्रतिक्रिया सौ गोखले या पुणे कर भगिनीने दिली असल्याचे श्री. जाधव यांनी सांगितले. त्याचप्रमाणे खरकटे, शिळे अन्न, भाज्यांचे देठ, टरफले, फळांच्या साली, हातांची नखे, केस, इत्यादींची विल्हेवाट गांडुळखत प्रकल्प किंवा कुंड्यांना घालून लावता येते. तसेच, यामुळे मिळकत करातही काही प्रमाणात सवलत मिळते. अशा प्रकारचे संदेश कला पथकाद्वारे सर्वसामान्य नागरिकांना देण्यात येत आहेत.

या श्रमिक कला पथकामध्ये जवळपास ८-१० महापालिका कर्मचारी कार्यरत असून, या श्रमिक कला पथकाचा सदस्य असल्याचा अभिमान आहे असे श्री. जाधव नम्रपणे नमूद करतात. याशिवाय या कला पथकास प्रशासनातर्फे वाहन व इतर सुविधा पुरविल्यामुळे ते प्रशासनाचे आभारही मानतात. श्री. जाधव यांनी, नागरिकांना कचरा विल्हेवाटीच्या अनुषंगाने अधिक माहिती आवश्यक असल्यास प्रशासन किंवा कला पथकाशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे. तसेच, महापालिका कचऱ्याच्या अनुषंगाने करत असलेल्या कार्यवाही, नागरिकांचा सहभाग आणि स्वच्छतेबाबतचा संदेश विविध प्रसार माध्यमांद्वारे सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोचविणे आवश्यक असल्याचे श्री. जाधव आवर्जून नमूद करतात.

## माहे जानेवारी, फेब्रुवारी सेवापूर्ती समारंभ संपन्न

महापालिकेची प्रदीर्घ सेवा करुन सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/सेवकांसाठी दरमहा सेवापूर्ती समारंभ सल्लागार (कामगार) कार्यालयामार्फत आयोजित करण्यात येतो. भारताचे माजी राष्ट्रपती मा. आर.वेंगटरमन यांचे दुखद निधनानिमित्तच्या राष्ट्रीय दुखवट्यामुळे माहे जानेवारी, २००९ चा सेवापूर्ती समारंभ स्थगित केला होता. त्यामुळे दिनांक २७/२/२००९ रोजी कॅ. वडके सभागृह येथे माहे जानेवारी व फेब्रुवारी, २००९ मध्ये सेवानिवृत्त झालेल्या अनुक्रमे एकूण २९ व ३३ अधिकारी/सेवकांसाठी एकत्रित कार्यक्रम आयोजित केला होता. या वेळी सेवानिवृत्तांत प्रामुख्याने डॉ. पी.एस.धायगुडे, आरोग्य प्रमुख, मा. दिलीप कुलकर्णी, व्हे.डेपो सुपरिंटेंडेंट, मा. चंद्रकांत शितोळे, सिनिअर ऑडिटर, डॉ. भालचंद्र वैद्य, वैद्यकीय अधिकारी यांचा प्रामुख्याने समावेश होता. या सेवापूर्ती समारंभासाठी प्रमुख पाहुण्या मा. मंगला मंत्री, सदस्य, स्थायी समिती, मा. सुनिल गायकवाड, क्षेत्रीय अधिकारी, वारजे कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालय, मा. दिलीप गावडे, क्षेत्रीय अधिकारी, घन कचरा व्यवस्थापन, मा. रमेश शेलार, विशेष कार्याधिकारी, अतिक्रमण, डॉ. एस.टी.परदेशी, सहाय्यक आरोग्य प्रमुख, मा. मुक्ता मनोहर, सरचिटणीस, पुणे मनपा कामगार युनियन व सल्लागार (कामगार) मा. नंदकिशोर जगताप उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुरुवातीस प्रमुख पाहुण्यांचा पुष्पगुच्छ देवून मा. नंदकिशोर जगताप यांनी स्वागत केले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकामध्ये मा. नंदकिशोर जगताप, सल्लागार (कामगार) यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सेवापूर्ती समारंभ आयोजित करण्यामागची भूमिका विषद केली. वर्ग १ व २ अधिकारी सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांचा सत्कार त्यांच्या विभागांमधून होत असतो. तथापि, वर्ग १ ते ४ अधिकारी/सेवकांचा एकाच व्यासपीठावर सेवापूर्ती समारंभ करण्यासाठी व केलेल्या प्रदीर्घ सेवेची दखल घेण्यासाठी हा कार्यक्रम सुरु केला असल्याचे त्यांनी सांगितले. याशिवाय सेवानिवृत्त सेवकांना त्यांचे अनुज्ञेय रकमा या कार्यक्रमात देण्याचा प्रयत्न यशस्वी होत असल्याचे दिसून येत आहे. तसेच, पुणे महापालिकेच्या कामांमध्ये नागरिकांचा सहभाग वाढविणे हा प्रयत्न आहे. त्यासाठी प्रदीर्घ सेवेतील अनुभवाची शिदोरी घेवून आपण सेवानिवृत्त होत आहात. त्या अनुभवाच्या शिदोरीसह मार्गदर्शकाच्या भूमिकेतून सर्वांनी प्रयत्नशील रहावे, असे आवाहन मा. नंदकिशोर जगताप यांनी केले. यानंतर कार्यक्रमामध्ये मा. सुनिल गायकवाड, क्षेत्रीय अधिकारी, वारजे कर्वेनगर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. महापालिका प्रशासनाने सुरु केलेल्या या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक करुन मा. गायकवाड यांनी सर्व सेवानिवृत्त सेवकांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. मंगला मंत्री, सदस्या, स्थायी समिती, पुणे मनपा यांनी आपल्या मार्गदर्शनामध्ये सेवानिवृत्त सेवकांनी केलल्या प्रदीर्घ सेवेबद्दल त्यांचे आभार मानले. तसेच, सेवानिवृत्त होताना मिळालेला निधी भविष्यकाळामध्ये आपल्यासाठीच उपयोगी पडेल अशा रितीने गुंतवावा. तसेच, सेवानिवृत्तीनंतर सर्वांनी कार्यमग्न राहून सामाजिक बांधिलकी म्हणून समाजाची सेवा करावी, असे आवाहन करुन त्यांनी सर्व सेवानिवृत्तांना शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमामध्ये मा. पी.एस.धायगुडे, आरोग्य प्रमुख, मा. दिलीप कुलकर्णी, डॉ. भालचंद्र वैद्य व श्री. पोपट मिसाळ यांनी सत्काराला उत्तर दिले. या उत्तरामध्ये सर्वांनी या उपक्रमाचे कौतुक करुन महापालिकेमधील सेवा करताना केलेल्या सर्व सहकाऱ्यांचे आभार मानले. सर्व सेवानिवृत्त सेवकांना या कार्यक्रमात शॉल, स्मृतिचिन्ह देवून गौरविण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्री. जयवंत शिंदे यांनी केले.



## महापालिका अधिकारी/सेवकांना बेळगाव येथे प्रशिक्षण

अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई यांचे वतीने महाराष्ट्र नागरी सेवा नियम या विषयावर दिनांक २ ते ४ मार्च, २००९ या कालावधीत बेळगाव येथे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षण शिबीराला महापालिकेतील वर्ग १ मधील ४, वर्ग २ मधील २, वर्ग ३ मधील १५ अशा २१ अधिकारी/सेवकांची निवड करण्यात आली होती. या प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन मा.जी.व्ही.तेंडोलकर, उप संचालक, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई, मा. एम.जी.वनकुद्रे, संचालक, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, बेळगाव, मा. पी.एस.देवरुखकर, प्रशिक्षण संचालक, महालेखापाल कार्यालय, मुंबई व महापालिका अधिकाऱ्यांचे हस्ते दीपप्रज्वलन करुन करण्यात आले.

या ३ दिवसांच्या प्रशिक्षणामध्ये शासकीय कर्मचारी सेवेत रुजू होण्यापूर्वी, रुजू झाल्यानंतर ते सेवानिवृत्तीपर्यंत विविध सेवा नियमांच्या अनुषंगाने प्रशिक्षणाचा कार्यक्रम आखण्यात आला होता. यामध्ये निवृत्ती वेतन, कुटुंब निवृत्ती वेतन, उपदान, निवृत्ती वेतनाचे प्रकार, निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण, रजेचे रोखीकरण, गटविमा योजना, सेवापुस्तक व त्यातील नोंदी, प्रथम नियुक्तीसाठी आवश्यक पात्रता (उदा. वैद्यकीय दाखला, वैद्यकीय दाखल्यासाठी असलेले सक्षम प्राधिकारी, इत्यादी) वेतन, वेतन निश्चितीकरण, वेतनवाढ, काल्पनिक वेतनवाढ, रजा, रजेचे प्रकार, विविध प्रकारच्या शासकीय शास्त्या, बदली, बढती, मानीव दिनांक, विभागीय चौकशीची कार्यपध्दती, दोषारोपपत्र, दोषारोपपत्राचे प्रकार, महत्व, दोषारोपपत्र बजावणे आणि विभागीय चौकशीतील विविध टप्पे, नैसर्गिक न्यायतत्व, पदग्रहण कालावधी, भविष्यनिर्वाह निधी, नव्याने शासनाने लागू केलेली परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना,या नवीन योजनेतील कर्मचाऱ्यांना मिळणारे फायदे, जुनी निवृत्ती वेतन योजना आणि परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना यातील फरक, इत्यादी बाबींच्या अनुषंगाने मा. श्री. पी.एस.देवरुखकर यांनी उदाहरणासह स्पष्टीकरण देवून मार्गदर्शन केले.

सदर प्रशिक्षणाचा समारोप दिनांक ४/३/२००९ रोजी पार पडला. यामध्ये सर्व सहभागी प्रशिक्षणार्थींना मा. श्री. तेंडोलकर व मा. देवरुखकर यांचे हस्ते प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. प्रशिक्षणाच्या कार्यक्रमाबाबत सहभागी प्रशिक्षणार्थींनी उत्स्फूर्त प्रतिक्रिया या कार्यक्रमात नोंदविल्या. यामध्ये श्री. अनिल वेल्हाळ, श्री. जयंत पवार, श्री. शिवाजी दौंडकर व ॲड. मंजुषा इधाटे यांनी प्रशिक्षणाची उपयुक्तता, प्रशिक्षणातील विषय या बाबींच्या अनुषंगाने सकारात्मक प्रतिक्रिया नोंदविल्या. महापालिकेतील पगारपत्रक लेखनिक व लेखनिकी संवर्गातील सेवकांसाठी महाराष्ट्र नागरी सेवा नियम व मनपा सेवा विनियम याबाबत प्रस्ताव सादर केल्यास प्रशिक्षण आयोजित करण्याची तयारी अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेने दर्शविली.

प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर बेळगाव महानगरपालिकेच्या




पाणीपुरवठा व कचरा डेपोस प्रशिक्षणार्थींनी भेट दिली. यामध्ये बेळगाव महापालिकेने १ लाख लोकसंख्येसाठी सुरु केलेल्या २४X७ या बहुपयोगी योजनेची सविस्तर माहिती घेतली. तसेच, या योजनेबाबत अधिक माहिती घेणेसाठी बेळगाव येथील झटपट कॉलनी या झोपडपट्टी परिसरास व अनगोळ येथील ग्राहक सेवा केंद्रास भेट दिली. या भेटीचे आयोजन बेळगाव महानगरपालिकेने अतिशय उत्कृष्टपणे केले होते.

या प्रशिक्षणामध्ये मा. लक्ष्मण डामसे, उप आयुक्त (गवनि), मा. वसंत पाटील व मा. सुनिल गायकवाड, क्षेत्रीय अधिकारी या वरिष्ठ अधिकाऱ्यांसह विविध विभागांतील अनेक संवर्गातील सेवकांनी प्रशिक्षणाचा लाभ घेतला. अशा प्रकारचे गरजेनुरुप प्रशिक्षण कार्यक्रम सातत्याने राबविणेबाबत सहभागी प्रशिक्षणार्थींनी प्रतिक्रिया नोंदविल्या आहेत. त्या अनुषंगाने सल्लागार (कामगार) कार्यालयामार्फत गरजेनुरुप प्रशिक्षण राबविण्याचा सातत्याने प्रयत्न होत असून चालू रहाणार आहेत.

## पुणे मनपामध्ये व्यक्तिमत्व विकास शिबीराचे आयोजन

केंद्रीय कामगार शिक्षण मंडळाच्या वतीने शासकीय, निमशासकीय आणि स्थानिक स्वराज्य संस्थांतील अधिकारी/सेवकांसाठी विविध प्रकारचे प्रशिक्षण आयोजित करण्यात येते. या प्रशिक्षण योजनेचा एक भाग म्हणून दिनांक १५ एप्रिल ते ५ मे, २००९ या कालावधीत २१ दिवसांचे व्यक्तिमत्व विकास या विषयावर शिबीर आयोजित करण्यात आले आहे. या शिबीरामध्ये राष्ट्रीय आर्थिक परिस्थिती, औद्योगिक संबंध, नेतृत्व शैली, उत्पादकता, शिक्षण, व्यक्तिमत्व विकास, व्यवस्थापकीय सहभाग, कामगार संघटना, महत्वाचे कामगार कायदे व त्यामधील तरतुदी, पुरविण्यात येणाऱ्या सेवांचा दर्जा, इत्यादी बाबींच्या अनुषंगाने केंद्रीय कामगार शिक्षण मंडळाकडील तज्ञ व अनुभवी प्रशिक्षक मार्गदर्शन करणार आहेत. संस्थेमधील कर्मचाऱ्यांच्या कामाचा दर्जा वाढविणे, सकारात्मक दृष्टिकोन आणि वातारण निर्माण करणे, संस्थेचे उद्दिष्ट साध्य करणे ही बाब सद्यस्थितीत अतिशय महत्वाची आहे. या अनुषंगाने वरील प्रशिक्षणाचा निश्चितपणे चांगला परिणाम होवून कर्मचाऱ्यांमधील सकारात्मकता व कार्यक्षमता वाढीस लागणार आहे.

हे शिबीर महापालिका भवन किंवा कामगार प्रशिक्षण हॉल, कसबा पेठ येथे होणार असून, ३ आठवडे पूर्ण वेळ आहे. तसेच, या शिबीरामध्ये ३० प्रशिक्षणार्थींची निवड करण्यात येणार आहे. तरी, इच्छुक सेवकांनी या प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा.

## हायर डिपार्टमेंटल परीक्षेत मन्यार अब्दुलरहेमान प्रथम

पुणे महापालिकेच्या लेखनिकी संवर्गातील सेवकांसाठी माहे जून, २००८ मध्ये घेण्यात आलेल्या हायर डिपार्टमेंटल परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला. या परीक्षेमध्ये ६९.६६% गुण मिळवून श्री. मन्यार रफिक अब्दुलरहेमान यांनी प्रथम क्रमांक मिळविला. तर ६८.६६% गुण मिळवून श्रीमती भाबड मनिषा संजय व श्री. चव्हाण आशिष लक्ष्मण यांनी संयुक्तरित्या द्वितीय क्रमांक पटकावला. तृतीय क्रमांक श्री. देवकर नितीन मारुती यांना प्राप्त झाला असून श्री. देवकर यांना ६८.३३% गुण मिळाले आहेत. या परीक्षेस एकूण २१६ परीक्षार्थींपैकी २०३ परीक्षार्थी बसले होते. यापैकी १३१ परीक्षार्थी या परीक्षेमध्ये उत्तीर्ण झाले आहेत. सर्व उत्तीर्ण परीक्षार्थी सेवकांचे कामगार कल्याण निधीमार्फत हार्दिक अभिनंदन.

**कल्याणवार्ता**
मार्च, २००९
❖ प्रकाशक तथा अध्यक्ष ❖
कामगार कल्याण निधी
मा. प्रवीणसिंह परदेशी
आयुक्त, पुणे महापालिका
❖ संपादक ❖
मा. नंदकिशोर जगताप
सल्लागार (कामगार)
❖ कार्यकारी संपादक ❖
शिवाजी दौंडकर
कामगार कल्याण अधिकारी
❖ सहाय्यक ❖
सौ. ज्योती अ.भोसले
❖ मुद्रक ❖
जयंत पवार
व्यवस्थापक,
मुद्रणमहर्षि मामाराव दाते
मुद्रणालय, मनपा, पुणे.
❖ प्रकाशन स्थळ ❖
पुणे महापालिका
शिवाजीनगर, पुणे ४११ ००५
या अंकात प्रसिध्द झालेल्या मतांशी प्रकाशक, संपादक, कार्यकारी संपादक व पुणे महापालिका सहमत असतीलच असे नाही.
❖ संपर्क ❖
सल्लागार (कामगार) कार्यालय,
पुणे महानगरपालिका.
दूरध्वनी क्र. २५५० १२५५/१२५२/१२५३
ईमेल आयडी
nandkumar.jagtap@punecorporation.org

## लॉन टेनिस स्पर्धेत कारकर विजयी



पुणे जिल्हा आंतरकचेरी क्रीडा असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या लॉन टेनिस क्रीडा प्रकारातील स्पर्धेत प्रौढांचे एकेरी गटात महापालिकेचे उप आयुक्त, मा. कुंडलिक कारकर यांनी प्रथम क्रमांक मिळविला. श्री. कुंडलिक कारकर यांनी एनडीएचे श्री. किशनलाल पासी यांचा ६-३, ६-४ असा पराभव करुन विजय संपादन केला. या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ डेक्कन जिमखाना क्लब टेनिस कोर्ट येथे शिवछत्रपती पुरस्कार विजेते व महाराष्ट्र राज्य लॉन टेनिसचे सरचिटणीस आनंद तुळपुले यांचे हस्ते पार पडला. फेब्रुवारी, ०९ मध्ये अमरावती येथे झालेल्या महाराष्ट्र राज्य महसुल खात्याच्या राज्यस्तरीय स्पर्धेमध्येही एकेरी आणि दुहेरी ओपनमध्ये सुवर्णपदक श्री. कारकर यांनी मिळविले आहे. श्री. कारकर यांच्या या यशाबद्दल कामगार कल्याण निधीमार्फत त्यांचे अभिनंदन.

## मुलगी झाली हो

फुल उमलण्या आधी नका तोडू आधी कळी ||
दिसामासाने वाढवून जन्म देण्याआधी का हो देता तिचा बळी||
का करता तिच्या जन्म घेण्यावर अन्याय ||
मुलगी आहे तुमची माता ||
दोन्ही घरचा करते नावलौकिक आणि उध्दार ||
दोन्ही घरचा उचलते भार ||
का करता भृण हत्येचे पाप ||
का गिरविता अंधश्रध्देचा कित्ता ||
आहे मुलापेक्षा मुलगी सर ||
नाही पडत तिला कधी मायेचा विसर ||
का समजता मग तिला कनिष्ठ ||
नाही तिच्याशिवाय जगात आपण ||
का फोडता तिच्या जन्म घेण्यावर खापर ||

**श्री. सुहास फाटक, मोटार सारथी, भवानीपेठ क्षे.का.**

## धनकवडी क्षेत्रीय कार्यालयातर्फे ओला-सुका कचरा नियोजन चर्चासत्र

जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने धनकवडी क्षेत्रीय कार्यालयातर्फे दिनांक ९ मार्च, २००९ रोजी प्रभागातील सर्व कोठ्यांवरील आरोग्य सेवकांसाठी ओला सुका कचरा विभाजन व नियोजन याबाबत मार्गदर्शनपर चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते.

या प्रसंगी मा. सुरेश जगताप, उपायुक्त (घन कचरा व्यवस्थापन), मा. उमेश माळी, क्षेत्रीय अधिकारी, धनकवडी क्षेत्रीय कार्यालय तसेच ओला कचरा जिरविण्याकरिता उपलब्ध असलेल्या विविध तंत्रज्ञानातील तज्ञ श्री. श्याम नातू (इनोरा) व श्रीमती ज्योती शहा, बायोसॅनिटायझर यांनी उपस्थित आरोग्य कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे उद्घाटन स्त्री शिक्षणाच्या पायाभरणीच्या अग्रस्थानी असणाऱ्या थोर समाज सेविका सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन व ज्यांनी मुलांना उच्च शिक्षण दिलेले आहे अशा आरोग्य सेविकांच्या हस्ते दीपप्रज्वलन करुन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविकामध्ये डॉ. केतकी घाटगे, क्षेत्रीय वैद्यकीय अधिकारी यांनी देवाची उरुळी येथील कचरा डेपो, अपुरी व एकमेव जागा, त्यामुळे निर्माण होणारे आरोग्यविषयक प्रश्न, भविष्यातील गंभीर समस्या व नागरिकांचा सहभाग या अनुषंगाने मार्गदर्शन केले.

या प्रसंगी श्री. श्याम नातू यांनी इनोरा कंपनीचे तंत्रज्ञान व श्रीमती ज्योती शहा यांनी बायोसॅनिटायझर या खत प्रकल्पाविषयी माहिती दिली. यानंतर सर्व आरोग्य कर्मचाऱ्यांनी धनकवडी स्मशानभूमी व शंकरमहाराज वसाहत येथे प्रत्येकी २०० व २५० किलो ओला कचरा




कुंडीमध्ये कचरा कसा जिरवता येईल याचे प्रात्यक्षिक करुन दाखवले. काही मोकादम व कमचाऱ्यांनी त्यांचे अनुभव या वेळी सांगितले. जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने सर्व आरोग्य कर्मचाऱ्यांनी ओला व सुका कचरा वेगळा करण्याचा व नागरिकांमध्ये प्रबोधन घडवून आणण्याचा संकल्प केला.

मा.सुरेश जगताप, उपायुक्त (घन कचरा व्यवस्थापन) यांनी सर्व कर्मचाऱ्यांना या विधायक उपक्रमासाठी शुभेच्छा देवून सर्वांनी उपक्रमाची सुरुवात आपल्या घरापासून करण्याविषयी आवाहन केले. मा. उमेश माळी यांनी असे प्रबोधनात्मक कार्यक्रम राबविण्याचा संकल्प सर्व आरोग्य कर्मचाऱ्यांनी केला आहे, असे सांगितले. तसेच, जिरविण्याकरिता क्षेत्रीय कार्यालयातर्फे खत प्रकल्प नियोजित असल्याची माहिती दिली.

या कार्यक्रमामध्ये ज्यांनी आपल्या मुलांना उच्च शिक्षण दिलेले आहे अशा महिला कर्मचारी, ओला सुका कचऱ्याचे विभाजन व नियोजनाकरिता यशस्वी सहभाग घेणारे मोकादम व संत निरंकारी मंडळाच्या प्रतिनिधींचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन श्री. घोलप, विभागीय आरोग्य निरीक्षक यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन मा. उमेश माळी, क्षेत्रीय अधिकारी, डॉ. केतकी घाटगे, क्षेत्रीय वैद्यकीय अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. घोलप, श्री. लाखे, श्री. मंदुपकर, श्री. वाढे व सर्व मोकादमांनी केले.

## मनपा सेवा प्रवेश आणि पदोन्नती सेवा नियम

मे. राज्य शासनाच्या निर्देशानुसार पुणे महानगरपालिकेच्या सेवेतील विविध संवर्गातील विविध हुद्यांच्या पदांवरील नियुक्त्या करणेकामी आदर्श सेवा प्रवेश व पदोन्नती सेवा नियम तयार करण्यात येत आहेत. प्राथमिक स्तरावर संबंधित खात्याकडून माहिती उपलब्ध करुन घेण्यात येत आहे. संबंधित खातेप्रमुखांशी चर्चा करुन त्याला अंतिम स्वरुप देण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे.

सेवा प्रवेश नियम आणि पदोन्नती सेवा नियम तयार करणेकामी पुणे महानगरपालिकेच्या सेवेतील अधिकारी/सेवकांच्या काही वैयक्तिक, मौलिक सूचना, हरकती आणि मार्गदर्शक उदाहरणे असल्यास संबंधितांनी ती सल्लागार (कामगार) कार्यालयाकडे लिखित स्वरुपात सादर करावीत. योग्य आणि विधीग्राह्य हरकती आणि सूचनांचा विचार करुन प्रस्तावित सेवा नियमांमध्ये त्यांचा अंतर्भाव निश्चित करण्यात येईल, याची नोंद घेवून आपले बहुमुल्य सहकार्य करण्यात यावे, असे आवाहन सर्व मनपा सेवक तसेच सेवानिवृत्त सेवकांना करण्यात येत आहे. आपल्या सूचना व हरकती नोंदवा.

## महत्वाचे

❖ माहिती अधिकार अधिनियम अंतर्गत दाखल झालेल्या प्रत्येक अर्जाची दखल घ्या

❖ अधिनियमातील तरतुदी नुसार विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन द्या.

❖ अर्ज विभागाशी संबंधित नसल्यास तो त्याच दिवशी संबंधित विभागाकडे पाठवून त्याप्रमाणे अर्जदारास लेखी कळवा.

❖ प्रथम अपिलांची सुनावणी विहित मुदतीत घ्या.

❖ अपिल प्राधिकाऱ्याच्या आदेशांची अंमलबजावणी करा.